राज्यातील एम.बी.बी.एस. अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना सामाजिक दायित्व सेवा अनिवार्य करण्याबाबत

# महाराष्ट्र शासन

## वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

## शासन निर्णय क्रमांकः एमईडी १०२१/प्र.क्र.१२८/२१/शिक्षण-२

गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
तारीख: १३ जून, २०२२

<u>वाचा -</u>

१) शासन निर्णय क्र.एमईडी १००७/सीआर-४९०/०७/शिक्षण-२, दिनांक ०८/०२/२००८
२) शासन निर्णय क्र. एमईडी १०१६/प्र.क्र.३४५/१६/शिक्षण-२, दिनांक ०५/०१/२०१८

<u>प्रस्तावना -</u>

राज्यातील शासकीय अथवा महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर शासनाकडून/महापालिकेकडून मोठया प्रमाणावर खर्च केला जातो. या खर्चाच्या तुलनेत विद्यार्थ्यांकडून आकारण्यात येणारे शैक्षणिक शुल्क अत्यल्प आहे. विद्यार्थ्यांवर होणारा खर्च हा जनतेकडून प्राप्त होणाऱ्या कराच्या उत्पन्नातून भागविला जात असल्याने जनतेच्या ऋणाची काही अंशी परतफेड व्हावी, या उद्देशाने उक्त विद्यार्थ्यांकडून शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था/संरक्षण दल यांची सेवा करण्याचे बंधपत्र प्रवेशाच्या वेळी लिहून घेण्यात येते. सदर सेवा बजाविण्यास जर उमेदवाराने नकार दिला अथवा कोणत्याही कारणास्तव कुचराई केली तर त्यांच्याकडून दंड वसुल करण्यात येतो. दिनांक ०८/०२/२००८ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार सामाजिक दायित्व सेवा न बजाविल्यास शैक्षणिक वर्ष २००४-२००५ ते २००७-२००८ पर्यंत एम.बी.बी.एस अथवा बी.डी.एस. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी रुपये ५ लक्ष आणि शैक्षणिक वर्ष २००८-२००९ पासून प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी रुपये १० लक्ष इतकी दंडाची तरतूद विहीत करण्यात आलेली आहे.एम.बी.बी.एस. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर बरेचसे विद्यार्थी हे सामाजिक दायित्व सेवा न करता दंडाचा भरणा करुन सदर सेवेतून मुक्त होतात. तथापि, कोविड महामारीच्या पार्श्वभूमीवर शासकीय यंत्रणेमध्ये अतिरिक्त वैद्यकीय व्यावसायिकांची निकड असल्याची बाब निदर्शनास आली आहे. त्यामुळे राज्यातून एम.बी.बी.एस. अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना सामाजिक दायित्व सेवा अनिवार्य करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय-

शासकीय/महापालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एस. अभ्यासक्रम उत्तीर्ण केलेल्या उमेदवारांनी सामाजिक दायित्व सेवेची बजावणी अनिवार्य करण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. यापूर्वीच्या आदेशानुसार सामाजिक दायित्व सेवा न करता दंडाच्या रकमेचा भरणा करुन सदर सेवेतुन सूट मिळण्याची तरतूद रद्द करण्यात येत आहे. सदर तरतूद ही सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून शासकीय/महापालिका वैद्यकीय महाविद्यालयांत एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमास प्रवेशित होणाऱ्या उमेदवारांसाठी लागू राहिल.

२. तसेच शासन निर्णय दिनांक ०५/०१/२०१८ अन्वये शासन अनुदानित/खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयातील एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमाचे जे विद्यार्थी शासनाच्या शिष्यवृत्ती/शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ घेतील, अशा उमेदवारांनीही सामाजिक दायित्व सेवा करणे आवश्यक आहे. सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षापासून शासन अनुदानित/खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयातील प्रवेशित उमेदवारांनाही सामाजिक दायित्व सेवेची बजावणी अनिवार्य असून दंडाचा भरणा करुन सदर सेवेतुन त्यांना सूट प्राप्त करता येणार नाही.

३. सन २०२१-२२ व त्यापूर्वीच्या शैक्षणिक वर्षामध्ये प्रवेशित उमेदवारांना त्या-त्या वेळचे प्रचलित नियम लागू राहतील.

४. उपरोक्त बदल वगळता शासकीय/महापालिका वैद्यकीय महाविद्यालयांतून तसेच शासन अनुदानित/खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयातून एम.बी.बी.एस. अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या उमेदवारांकरिता सामाजिक दायित्व सेवेसंदर्भातील (बंधपत्रित सेवेसंदर्भातील )विविध आदेशांद्वारे लागू यापूर्वीच्या इतर अटी व शर्ती कायम राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेताक २०२२०६१३१७३८३८०८१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJIT TUKARAM SASULKAR

( अजित सासुलकर )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राज भवन, मलबार हिल, मुंबई
मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई
सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका/ठाणे महानगरपालिका/पुणे महानगरपालिका
आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
सर्व अधिष्ठाता, शासकीय/शासन अनुदानित/महापालिका/खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालये (संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, यांचेमार्फत)
सर्व सहसचिव/उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
निवडनस्ती (शिक्षण-२)